# पाकिस्तान
## का मतलब क्या?

इस्लामी चेहऱ्याच्या पेचात आणि
भारतविरोधात फसलेला देश

श्रीधर लोणी

राजहंस प्रकाशन

माझे वडील

*सिद्धराज लोणी*

यांच्या पवित्र स्मृतीस,

त्यांच्यामुळे मला वाचनाची गोडी लागली.

# ऋणनिर्देश

पाकिस्तानबद्दलचे कुतूहल मला नेमके कधी निर्माण झाले हे सांगता येणार नाही; परंतु ते अगदी महाविद्यालयीन जीवनापासूनचे आहे हे खरे. धर्माच्या आधारावर भारतापासून वेगळा झालेला पाकिस्तान त्यावेळी माझ्यासमोर येत होता तो क्रिकेटच्या सामन्यांतून, 'रेडिओ पाकिस्तान'वरील 'आलमी स्पोर्ट्स राउंडअप'सारख्या कार्यक्रमांतून किंवा उर्दू बातम्यांतून. तो काळ होता ऐंशीच्या दशकाच्या उत्तरार्धाचा. काश्मीरमधील पाकिस्तानपुरस्कृत दहशतवाद्यांच्या वाढलेल्या कारवायांतून, झिया उल हक यांच्या धार्मिक अतिरेकातून पाकिस्तानचा एक धार्मिक कट्टरपंथीय चेहरा समोर येत होता. पाकिस्तानात धर्माचा इतका अतिरेक का, त्याचा भारतविरोध इतका टोकाचा का, असे प्रश्न त्यावेळी पडायचे.

पुढे पत्रकारितेत आल्यानंतर, संरक्षणविषयक बातमीदारी करू लागल्यानंतर, पाकिस्तानवरील काही पुस्तके वाचल्यानंतर त्या देशाबद्दल अधिक जाणून घेता येऊ लागले. मात्र, पाकिस्तानकडे पाहण्याचा दृष्टिकोन भारतीय होता. पाकिस्तानी स्वत:कडे, आपल्या इतिहासाकडे, भारत-पाकिस्तान यांच्या ऐतिहासिक-सांस्कृतिक वारशाकडे कसे पाहतात हे मात्र समजत नव्हते. इंटरनेटचा जमाना सुरू झाल्यावर तेथील वृत्तपत्रांच्या ऑनलाइन आवृत्त्या वाचता येऊ लागल्या. त्यांतून पाकिस्तानचा दृष्टिकोन लक्षात येऊ लागला; परंतु ते पुरेसे वाटत नव्हते. पाकिस्तानी इतिहासकार मुबारक अली यांनी लिहिलेले 'पाकिस्तान : इन सर्च ऑफ आयडेंटिटी' हे पुस्तक काही वर्षांपूर्वी हातात पडले आणि पाकिस्तानच्या समोर असलेल्या अस्मितेचा पेच लक्षात आला. त्यानंतर हुसेन हक्कानी, इश्तियाक अहमद, आयेशा जलाल, आयेशा सिद्दिका, परवेझ हूदभाई यांसारख्या पाकिस्तानी लेखकांची पुस्तके आणि लेख वाचत गेलो आणि पाकिस्तानचा दृष्टिकोन समोर येत गेला. भारतापासून वेगळे होण्यामागच्या राजकारणापासून अस्तित्व टिकविण्यासाठी भारताच्या विरोधातील शत्रुत्वापर्यंतची पाकिस्तानची कारणमीमांसाही जाणवू लागली. मात्र, स्वतंत्र देश मिळविल्यानंतरही इस्लाम आणि भारतविरोध यांमध्येच स्वत:चे अस्तित्व शोधण्याच्या नादात तो आयडेंटिटीच्या चक्रव्यूहात अडकत गेल्याचेही जाणवले. पाकिस्तानबद्दलचे हे आकलन म्हणजे हे पुस्तक.

हे पुस्तक म्हणजे पाकिस्तानच्या इतिहासाचे पुस्तक नाही; हे आहे, 'पाकिस्तान का मतलब क्या?' या तिथे आजही उपस्थित केल्या जाणाऱ्या प्रश्नाबद्दलचे; त्याच्या उत्तराबद्दलचे पुस्तक. इस्लामलाच राष्ट्रीयत्व मानून देशाची उभारणी करताना पाकिस्तान कसा फसत गेला आणि स्वत:च्या ओळखीचाच प्रश्न त्याला कसा भेडसावत गेला, याचा वेध या पुस्तकात घेतला आहे. या विषयाच्या अनुषंगाने पाकिस्तानच्या इतिहासाचा आणि वर्तमानाचा धांडोळा यात घेण्यात आला आहे. पाकिस्तानच्या आजवरच्या वाटचालीचा धावता आढावाही यात आहे. त्याचबरोबर पाकिस्तानात राजकीय संस्था का विकसित झाल्या नाहीत, तिथे लष्कराचे वर्चस्व का निर्माण झाले, तिथे मूलतत्त्ववादाचा प्रसार का होत गेला, आर्थिक आघाडीवर तो का अपयशी ठरला आणि मुख्य म्हणजे एक साधारण (नॉर्मल) देशासारखा तो का वागत नाही, या प्रश्नांची उत्तरे मिळविण्याचा प्रयत्नही केला आहे. देशाच्या उभारणीपेक्षा धर्मावरील अधिष्ठानावर भर देण्याच्या धोरणांमुळे आणि भारतविरोधी मानसिकतेमुळे पाकिस्तान गर्तेत सापडत गेला. दिवाळखोरीच्या आणि यादवीच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचला; याबाबत तेथील सजग नागरी समाज काय विचार करतात आणि ते देशाची दिशा बदलू शकतात काय आणि मुख्य म्हणजे पाकिस्तानचे भवितव्य काय, याबाबतचे विवेचनही पुस्तकात आहे. या पुस्तकात, पाकिस्तानी शहरांची वा ठिकाणांची नावे, स्थानिक उच्चारानुसार केली आहेत.

हे पुस्तक लिहिण्याची सुरुवात झाली, ती 'महाराष्ट्र टाइम्स'च्या २०२२च्या दिवाळी अंकात लिहिलेल्या लेखाने. भारत आणि पाकिस्तान यांच्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने मी 'आयडियालॉजीत फसलेला पाकिस्तान' हा लेख लिहिला होता. आंतरराष्ट्रीय घडामोडींचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. श्रीकांत परांजपे यांना तो आवडला होता. या लेखाची संकल्पना घेऊन आणखी विस्ताराने लेखन करावे, अशी सूचना त्यांनी त्याचवेळी केली होती. ज्येष्ठ पत्रकार-संपादक आणि मित्रवर्य प्रशांत दीक्षित यांनाही हा लेख आवडला; त्यांनी तर या विषयावर पुस्तक लिहिण्याची सूचना केली. इतकेच नव्हे, तर त्यांनी स्वत: पुढाकार घेऊन 'राजहंस प्रकाशन'चे संचालक दिलीप माजगावकर यांना हा लेख वाचायला दिला. त्यानंतर माजगावकर यांनी मी हे पुस्तक लिहावे, असे सुचविले. त्यांच्या या सूचनेमुळे हुरूप आला आणि पुस्तकाचा आराखडा तयार केला. त्यानंतर सुरू झाला, तो पुस्तकलेखनाचा प्रवास.

पुस्तक लिहिण्यासाठी अनेकांनी मदत केली. माझे गेल्या तीन दशकांपासूनचे मित्र आणि 'महाराष्ट्र टाइम्स'चे मुख्य संपादक पराग करंदीकर यांनी मला

त्यासाठी प्रोत्साहन दिले. त्याचबरोबर पुस्तकाच्या प्रगतीचीही त्यांनी आस्थेने वेळोवेळी चौकशीही केली. माझी पत्नी रेखा आणि मुलगा श्रेयस यांची मदतही मोलाची होती. दररोजचे काम आणि पुस्तकलेखन यांतून घरच्यांसाठी वेळ काढणे अवघड होते; मात्र त्यांनी कसलीही तक्रार केली नाही. श्रेयसने सुरुवातीची काही प्रकरणे वाचून सूचनाही केल्या. 'महाराष्ट्र टाइम्स'मधील सहकारी अभिजित थिटे यांनी, तसेच माजी सहकारी सुरेश इंगळे यांनी पुस्तकाचा पहिला मसुदा वाचून केलेल्या सूचना महत्त्वाच्या होत्या.

डॉ. श्रीकांत परांजपे यांनीही पहिला मसुदा वाचून, राज्यशास्त्राच्या अभ्यासकाच्या दृष्टिकोनातून काही मुद्दे सांगितले. या पुस्तकाला प्रस्तावना लिहून देण्याची विनंतीही त्यांनी लगेचच मान्य केली. त्यांची प्रस्तावना म्हणजे पाकिस्तानवरील एक महत्त्वपूर्ण भाष्यच म्हणावे लागेल. त्यांच्या या प्रस्तावनेमुळे पुस्तकाचे मूल्यवर्धन झाले आहे. त्याबद्दल त्यांचे आभार मानावेत तितके कमीच. प्रशांत दीक्षित यांनी बारकाईने वाचन करून, सर्वसामान्य वाचकांच्या दृष्टिकोनातून सांगितलेले मुद्दे महत्त्वाचे होते.

हे माझे पहिले पुस्तक नसले, तरी मोठ्या कालावधीनंतर पुस्तकलेखन झाले. मराठी प्रकाशनाच्या क्षेत्रात स्वत:चे आगळे स्थान निर्माण करणाऱ्या 'राजहंस'ची मुद्रा या पुस्तकावर उमटते आहे, ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे. दिलीप माजगावकर, प्रशांत दीक्षित यांच्या पाठपुराव्यामुळे आणि सर्व स्नेहीजन, कुटुंबीय यांच्या प्रोत्साहन आणि सहकार्यामुळे हे शक्य होत आहे.

पुस्तकलेखनाला मदत केलेल्या सर्वांच्या प्रति मी कृतज्ञ आहे.

**श्रीधर लोणी**

# प्रस्तावना

आपण भारतात बसून पाकिस्तानबाबत विचार करतो, तेव्हा दोन घटकांवर लक्ष केंद्रित केले जाते : एक, हा इस्लामी देश असून, त्याची अस्मिता (आयडेंटिटी) धर्मावर आधारित आहे; दोन, हा दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य परिषदेचा (सार्क) सदस्य असलेला देश आहे. मात्र, त्याची अस्मिता, त्याचा जागतिक दृष्टिकोन, राजकीय आणि सांविधानिक घटक, तेथील सामाजिक घडण, संरक्षणविषयक बाबी आदींबाबत पाकिस्तानी चष्म्यातून विचार केल्यास वेगळे चित्र दिसू शकते. दुर्दैव असे, की पाकिस्तानबाबत बहुतेक विवेचन पाश्चिमात्य अभ्यासकांनी केले असून, आपण तेच ग्राह्य मानून चालतो. ज्येष्ठ पत्रकार, 'महाराष्ट्र टाइम्स'च्या पुणे आवृत्तीचे संपादक श्रीधर लोणी यांनी या पुस्तकात पाकिस्तानी विश्लेषकांच्या दृष्टिकोनातून पाकिस्तानचा अभ्यास केला आहे. पाकिस्तानचा इतिहास, संस्कृती, तेथील राजकीय व आर्थिक स्थिती आणि एकूण पाकिस्तानी मानसिकता समजून घेण्यासाठी त्यांनी केलेले हे एक प्रामाणिक लेखन आहे.

या पुस्तकाची सुरुवात श्रीधर लोणी पाकिस्तानच्या निर्मितीच्या संदर्भातील चर्चेने करतात. 'पाकिस्तान का मतलब क्या' या प्रश्नाचे उत्तर *'ला इलाह इल्लल्लाह'* यात आहे आणि ही केवळ १९४७मधील भाषा नसून, ती आजही वापरली जात असल्याचे ते नमूद करतात. झुल्फिकार अली भुट्टो यांनी पंतप्रधान असताना लिहिलेल्या एका पुस्तिकेत याच इस्लामी अस्मितेचा उल्लेख केला आहे. भुट्टोंच्या मते, स्वातंत्र्यानंतर भारतापासून असलेल्या धोक्याला सामोरे जाण्यासाठी पाकिस्तानने सुरुवातीला अरब देशांकडे धाव घेतली; परंतु अरब देशांनी त्याला प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर पाकिस्तानला चीन आणि अमेरिका यांच्याकडे जाणे भाग पडले. पाकिस्तानच्या आण्विक कार्यक्रमाचे 'इस्लामिक बॉम्ब' हे नामकरणही भुट्टो यांनीच केले होते. पाकिस्तान स्वतःला केवळ दक्षिण आशियाई देश मानत नाही, तर पश्चिम आशियाई प्रदेशाचा एक भागही मानतो; त्याचबरोबर मध्य आशियाशी इस्लामी पातळीवर आपली जवळीक असल्याचेही मानतो.

पाकिस्तानच्या बाबतीत इस्लामबरोबर भाषेचा घटकही महत्त्वाचा आहे. भाषा ही केवळ संज्ञापनाचे साधन नाही, तर ती एक संस्कृतीही आहे. म्हणूनच

पाकिस्तानने 'उर्दू' ही राष्ट्रभाषा स्वीकारली आहे. इस्लाम, भारतविरोध आणि उर्दू हे पाकिस्तानच्या विचारप्रणालीचे आधारस्तंभ असल्याचे लोणी नमूद करतात. मात्र, पाकिस्तानच्या निर्मितीच्या काळात किंवा नंतर राष्ट्रउभारणीच्या काळात यासंदर्भातील ध्येयधोरणांची आणि इस्लामची भूमिका काय असेल, याचा विचार फारसा झाला नव्हता, हेही लोणी सांगतात. असे असले, तरी 'आयडियालॉजी ऑफ पाकिस्तान' हा विषय शालेय अभ्यासक्रमाचा भाग आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे.

पाकिस्तानचे लष्कर हे तेथील राज्यव्यवस्थेचा एक अत्यंत महत्त्वाचा अविभाज्य घटक आहे. एखाद्या देशात लष्करी राजवट का येते? राज्यशासनव्यवस्थेत अनेक घटक आपले योगदान देत असतात. राज्यघटना, त्यातून निर्माण झालेल्या संसदेसारख्या संस्था, नोकरशाही, राजकीय पक्ष, नागरी समाज आदी घटक राज्यव्यवस्थेतील संघर्षाचे, कोणताही उद्रेक होऊ नये यासाठीचे व्यवस्थापन करीत असतात. जेव्हा हे घटक आपल्या कामात कमी पडतात, निष्प्रभ ठरतात, तेव्हा लष्कराचा हस्तक्षेप होतो. पाकिस्तानात पहिली लष्करी राजवट १९५८मध्ये आली. पुढे लष्कराची आर्थिक, राजकीय क्षेत्रावर पकड घट्ट होत गेली. आज तिथे लष्कराच्या मान्यतेशिवाय राज्यव्यवस्था चालू शकत नाही. लष्कराच्या या पकडीचे श्रीधर लोणी यांनी उत्तम विश्लेषण केले आहे.

पाकिस्तानात जिहादचे वारे १९७९नंतर वाहू लागले. तत्कालीन सोव्हिएत संघाचा अफगाणिस्तानातील हस्तक्षेप, तेथून पाकिस्तानात आलेले मुजाहिदीन हे इस्लामी लढवय्ये आणि त्यांना असलेला अमेरिकेचा पाठिंबा या घटनांतून जिहादची सुरुवात झाली. पुढे सोव्हिएतने अफगाणिस्तानातून माघार घेतली. अफगाणिस्तानात प्रारंभी मुजाहिदीनचे सरकार स्थापन झाले; पुढे तिथे तालिबानी राजवट आली. तेथील या बदलांत पाकिस्तानचा सक्रिय सहभाग होता. अमेरिकेवरील ९/११च्या हल्ल्यानंतरही तालिबानला किंवा 'अल कायदा'ला पाकिस्तानने मदत केली. अफगाणिस्तानात लढलेल्यांना पाकिस्तानने काश्मीरमध्ये पाठविण्यास सुरुवात केली. आज त्यांचेच गट पाकिस्तानच्या राज्यव्यवस्थेविरुद्ध लढताना दिसतात. त्यांचा धोका प्रथम जनरल परवेझ मुशर्रफ यांना जाणवला होता.

पाकिस्तानने दहशतवाद्यांना काश्मीरमध्ये पाठविण्यास सुरुवात केली, ती १९८९-९०च्या सुमारास. त्यामागे नियोजनबद्धताही होती. पाकिस्तान सुरुवातीला काश्मीरमध्ये तेथील म्होरक्यांच्या आधारे लढत होता; तो त्याने नव्वदच्या दशकात मुजाहिदीनांकडे सुपुर्द केला. 'लष्कर ए तैयबा', 'जैश ए

महंमद' यांसारख्या दहशतवादी संघटना या लढ्याला कट्टर इस्लामिक स्वरूप देऊ लागल्या. काश्मीरच्या या लढ्यात 'इंतिफदा' (उठाव) हा शब्दप्रयोगही केला जाऊ लागला. भारताने काश्मीरबाबतचे ३७०वे कलम रद्द केल्यानंतर पाकव्याप्त काश्मीरमध्ये त्याचा जोरदार निषेध झाला. जम्मू-काश्मीर मिळवायचे असेल, तर तो प्रदेश एकसंध असण्याची गरज हे त्यामागील एक कारण. कलम ३७० रद्द करतानाच लडाख जम्मू-काश्मीरपासून वेगळा केला गेला. हाच मुद्दा पाकिस्तानातही वेगळ्या पद्धतीने उपस्थित झाला होता. गिलगिट-बाल्टिस्तानला सुरुवातीला 'नॉर्दन टेरिटरीज' म्हणून तिथे वेगळे स्थान दिले गेले. नंतर इम्रान खान सरकारने त्याला राज्याचा दर्जा देण्याचे ठरविले. या निर्णयावर 'आझाद काश्मीर'मध्ये टीका झाली होती, ती याच कारणाने.

या पुस्तकातील एक प्रकरण पाकिस्तानातील अंतर्गत कलहाबाबत आहे. तेथील पंजाब, सिंध, खैबर पख्तुनख्वा आणि बलुचिस्तान या चारही प्रांतांची स्वतःची वेगळी अस्मिता आहे; तसेच सामाजिक आणि राजकीय विकासाच्या बाबतीत त्यांमध्ये फरक आहे. तेथील शासनव्यवस्था, अर्थकारण, लष्कर या सर्वांत पंजाबचे वर्चस्व आहे. सामाजिकदृष्ट्या या प्रांतात आजही सरंजामशाही दिसते. त्यामानाने सिंध अधिक उदारमतवादी आहे. बलुचिस्तान आणि खैबर पख्तुनख्वा कायम दुर्लक्षित राहिलेले आहेत. गवादर बंदरामुळे बलुचिस्तान आणि तालिबानींमुळे खैबर पख्तुनख्वा आज चर्चेत आहेत. चीन आणि पाकिस्तान यांच्यातील आर्थिक महामार्गाच्या 'सीपेक' प्रकल्पाला बलुचिस्तानात आणि व्याप्त काश्मीरमधील गिलगिट-बाल्टिस्तान येथे चीनच्या विरोधात आंदोलने होत आहेत. सिंधमध्ये मोठ्या प्रमाणात पठाणांचे स्थलांतर आहे; त्यामुळे तेथील सामाजिक तणाव वाढत आहे. परिणामी, प्रांता-प्रांतांमधील संघर्ष वाढत आहे. यातून पाकिस्तानचे विघटन होऊ शकते काय? याबाबत आपले मत देताना श्रीधर लोणी सावधानता बाळगतात. आंतरराष्ट्रीय विश्लेषकही अशीच सावधानता बाळगतात. पाकिस्तान एकसंध राहण्यात भारताचे हित असल्याचे मानले जाते; कारण पाकिस्तानचे विघटन झाल्यास भारताच्या एकात्मतेवर त्याचे विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे.

आपली अर्थव्यवस्था सावरण्यासाठी पाकिस्तानने आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडे अनेकदा खेपा घातल्या आहेत. शिवाय धार्मिक चौकटीचा वापर करून त्याने सौदीकडून, तर भू-सामरिक स्थानाचा वापर करून अमेरिकेकडून आर्थिक मदत मिळविली आहे. मात्र, ही मदत प्रामुख्याने लष्करासाठी वापरली जात असे; पायाभूत उद्योगांसाठी नाही. पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेचे आणखी एक

वैशिष्ट्य म्हणजे तेथील उच्चभ्रूंचे वर्चस्व. उच्चभ्रू आणि सर्वसामान्य यांच्यातील संबंध 'राज्यकर्ते' आणि 'प्रजा' कसा आहे, हे श्रीधर लोणी यांनी, डॉ. रोझिता आर्मिटेज यांच्या विश्लेषणाचा दाखला देऊन दाखवून दिले आहे. चीनने पाकिस्तानच्या लष्कराला नेहमीच मदत केली असली आणि आण्विक कार्यक्रमाला सहकार्य दिले असले, तरी 'सीपेक'च्या निमित्ताने चीन पाकिस्तानचे आर्थिक शोषण करताना दिसत आहे. गवादर बंदरावर ताबा मिळविणे हा त्याचा केवळ एक भाग आहे.

पाकिस्तानचे अमेरिकेशी असलेले संबंध गुंतागुंतीचे आहेत. शीतयुद्धाच्या काळात साम्यवादी देशांच्या विरोधातील लष्करी गटात पाकिस्तान सामील होता. आज अमेरिकेला वेगवेगळ्या कारणाने पाकिस्तानची मदत हवी असते. १९९१नंतर मध्य आशियाई देशांशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी अमेरिकेला पाकिस्तान उपयुक्त होता. तीच उपयुक्तता अफगाणिस्तान आणि तालिबान यांच्या संदर्भात होती. ओसामा बिन लादेन आणि 'अल कायदा' यांना पाकिस्तान मदत करीत असला, तरी अमेरिका त्याच्याशी संबंध ठेवून होती. लोणी यांच्या मते, अमेरिकेसाठी आता पाकिस्तानची उपयुक्तता संपत चाललेली दिसते; परंतु प्रत्यक्षात हे कितपत खरे ठरेल याबाबत शंका आहे.

या पुस्तकाच्या उपोद्घातात लोणी यांनी इम्रान खान यांचे राजकारण उलगडून दाखविले आहे. इम्रान यांनी 'नया पाकिस्तान' या संकल्पनेचा वापर करून लष्कराच्या दबावाखाली वावरत असलेल्या 'पुराना पाकिस्तान'ला आव्हान देण्याचा प्रयत्न केला. स्वत:च्या राजकीय भवितव्यासाठी इम्रान एक अवकाश शोधत होते. हा अवकाश लष्करी आणि इस्लामी व्यवस्थेपासून वेगळा होता; परंतु दुर्दैव असे, की आपल्या राजकीय अस्तित्वासाठी आणि त्याच्या अधिमान्यतेसाठी त्यांनी इस्लामी प्रवृत्तींनाच जवळ केले. तिथे इम्रान यांची प्रतिमा कलंकित झाली. लष्कराला बाजूला ठेवण्यासाठी इस्लामी गटांना जवळ करून राज्यव्यवस्था चालविता येत नसल्याचा धडा नवाज शरीफ यांनी आधी घेतला होता; तोच धडा इम्रान यांना मिळत असावा.

एक स्वतंत्र, सार्वभौम आणि एकसंध राष्ट्र म्हणून पाकिस्तानचे भवितव्य काय असेल? या पुस्तकाच्या उपसंहारात याची चर्चा आहे. पाकिस्तान हे एक 'फेल्ड स्टेट' आहे काय? तसे ते होऊ शकते काय? 'फेल्ड स्टेट'ची उपाधी अफगाणिस्तानातील तालिबानी राजवटीबाबत वापरली जात असे; आता त्याबाबत फारसे बोलले जात नाही. पाकिस्तानच्या भवितव्याबाबत अनेक मते मांडली गेली आहेत. त्यातील काहींचा उल्लेख श्रीधर लोणी करतात.

मात्र, ही मते मांडणारे बहुतांश अभ्यासक पाश्चिमात्य आहेत. ते अनेक तर्क मांडतात. त्यांत 'उदारमतवादी पाकिस्तान' किंवा इस्लामी वा लष्करशाहीप्रधान पाकिस्तान यांसारखे तर्कही आहेत. पाकिस्तानातील स्थितीबाबत तेथील बहुतांश तरुण नाराज आहेत. ही नाराजी ते समाजमाध्यमांवर व्यक्तही करीत आहेत. पाकिस्तानात बदल घडावा, अशी आशा त्यांना आहे. या तरुणांच्या वैचारिक मंथनाची जाणीव श्रीधर लोणींना आहे. म्हणूनच ते पाकिस्तानला 'फेल्ड स्टेट' मानायला तयार नाहीत. कुठेतरी बदल घडेल, अशी आशा त्यांना आहे; कारण पाकिस्तानकडे ते पाश्चिमात्य चष्म्यातून बघत नाहीत. त्यांच्या लेखनात कुठेतरी पाकिस्तानबाबत सहानुभूती जाणवते. पाकिस्तानपासून कोणते धडे घेता येतील या विवेचनाद्वारे त्यांनी ते मांडले आहेत. केवळ धार्मिक अस्मितेचा किंवा द्वेषाचा आधार घेऊन राष्ट्राची उभारणी करता येत नसल्याचे ते प्रामुख्याने सांगतात.

श्रीधर लोणी यांचे हे अभ्यासपूर्ण पुस्तक पाकिस्तानचा इतिहास, संस्कृती, राज्यव्यवस्था, राजकारण, अर्थव्यवस्था, सामाजिक बांधणी या सर्व बाबी समजण्यासाठी अतिशय उपयुक्त आहे. अशा प्रकारचे सखोल विवेचन मराठीत वाचायला क्वचितच मिळते. हे पुस्तक केवळ अभ्यासकांनाच नव्हे, तर सर्वसामान्य वाचकांनाही उपयुक्त ठरणार आहे. आपला शेजारी देश नीट समजून घेण्याची भारतीयांना खरोखरच गरज आहे.

**श्रीकांत परांजपे**
आंतरराष्ट्रीय घडामोडींचे अभ्यासक, माजी प्रमुख संरक्षण
आणि सामरिकशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| □ | उपोद्घात | १७ |
| एक | पाकिस्तान का मतलब क्या? | २५ |
| दोन | इतिहासातील पाऊलखुणा शोधण्याची खटपट | ४० |
| तीन | अस्तित्वाला आधार इस्लामचा | ६३ |
| चार | लष्कर : शक्तिशाली पालक | ८८ |
| पाच | जिहादचे कारखाने | १०४ |
| सहा | दहशतवादाचे सुपरमार्केट | १२४ |
| सात | पाकिस्तानची दुखरी नस | १४५ |
| आठ | तालिबान : चांगले(?) अन् वाईट(!) | १५९ |
| नऊ | प्रांतिक अस्मिता आणि फुटीरतावाद | १७९ |
| दहा | अधोगतीच्या मुळाशी | २०६ |
| अकरा | उच्चभ्रूंच्या देशा | २२८ |
| बारा | अस्तित्वासाठी शत्रुत्व! | २४५ |
| तेरा | ‘डबल गेम’ | २६२ |
| चौदा | ‘सामरिक खोली’च्या गर्तेत | २७७ |
| पंधरा | चिनी मैत्रीच्या विळख्यात! | २९३ |
| □ | उपसंहार | ३०५ |
| □ | निवडक संदर्भसूची | ३१८ |

# उपोद्घात

*हातात काठ्या आणि दगड घेऊन संतप्त जमाव लाहोर कोअर कमांडरच्या बंगल्यात घुसतो. पाकिस्तानातील सर्वांत शक्तिमान असलेल्या लष्करालाच तो धडका मारतो. पाकिस्तानचे संस्थापक बॅ. महंमद अली जीना ज्या बंगल्यात एकेकाळी राहिले, त्या 'जीना हाउस'मध्ये जमावाचा धुडगूस सुरू होतो. बंगल्यातील काचेच्या वस्तू, दरवाजे, कपाटे, टीव्ही, टीपॉय, दिवे, भिंतीवरील फोटो आदी दिसेल त्या वस्तू काठीने फोडल्या जातात. जमावातील काही जण फ्रीज उघडून त्यातील सर्व वस्तू घेतात. शीतपेयांच्या बाटल्यांबरोबरच भेंडी, हिरव्या मिरच्या, बटाटे आणि अन्य भाज्याही ते लुटतात. बंगल्याच्या आवारात असलेले मोरही ते उचलून नेतात. सगळी मोडतोड झाल्यानंतर संपूर्ण बंगल्याला आग लावून जमाव निघून जातो. हा सारा प्रकार तेथील सैनिक मूकपणाने पाहत होते. 'सांगितलं होतं नां, इम्रान खानला हात लावू नका म्हणून,' असे हा जमाव या सैनिकांना बजावत होता. या जमावावर सैनिकांनी ना लाठीमार केला, ना गोळीबार. हतबल होऊन ते मोडतोड, जाळपोळ बघत राहिले..*

*लाहोरमध्ये हा प्रकार होत असताना, तिकडे रावळपिंडीत, पाकिस्तानी लष्कराच्या मुख्यालयावर (जीएचक्यू) एक जमाव चाल करून गेला. तिथेही सैनिकांनी जमावाला रोखले नाही. मियाँवाली (पंजाब) येथील पाकिस्तानी हवाई दलाच्या तळावर दंगलखोरांनी हल्ला केला. काकुल येथील पाकिस्तानी मिलिटरी ॲकेडमी, आर्मी वेल्फेअर ट्रस्टची कार्यालये यांनाही दंगलखोरांनी लक्ष्य केले.*

पाकिस्तानच्या भौगोलिक सीमांचेच नव्हे, तर द्विराष्ट्र सिद्धांतातून निर्माण झालेल्या 'इस्लामी पाकिस्तान'च्या संकल्पनेचेही रक्षक असल्याच्या भूमिकेतून देशाचे पालकत्व स्वीकारलेल्या लष्करासाठी अशा प्रकारचे हल्ले नवीन होते. दहशतवाद्यांनी लष्करी संस्थांना लक्ष्य केल्याच्या घटना याच्या आधीही घडल्या असल्या, तरी संतप्त जमावाने त्यांवर चाल करून गेल्याच्या घटना क्वचितच घडल्या होत्या. त्याला छेद देणाऱ्या वरील काही घटना घडल्या, त्या ९ मे २०२३ रोजी. कारण होते, इम्रान खान यांच्या अटकेचे.

१९९२च्या क्रिकेट विश्वकरंडक स्पर्धेत पाकिस्तानला विजेतेपद मिळवून

देणारे इम्रान खान आता पाकिस्तानच्या राजकारणात केंद्रस्थानी आले होते. १९९६पासून राजकारणात चाचपडणारे इम्रान आणि त्यांचा 'पाकिस्तान तेहरीक ए इन्साफ' (पीटीआय) हा पक्ष २०२३मध्ये पाकिस्तानातील सर्वात शक्तिमान असलेल्या लष्कराला आव्हान देत होते. वास्तविक, पाच वर्षांपूर्वी म्हणजे २०१८मध्ये खुद्द लष्करानेच इम्रान यांना सत्तेवर आणले होते. आपल्या इशाऱ्यांनुसार नाचणाऱ्यांना सत्तेवर आणणे आणि ते डोईजड होऊ लागले, की त्यांना सत्तेवरून उतरवून दुसऱ्यांना बसविणे हा पाकिस्तानी लष्कराचा हातखंडा खेळ. त्यानुसार २०२२मध्ये इम्रान जेव्हा लष्कराला जुमेनासे झाले, तेव्हा त्यांना हटविण्यात आले आणि शाहबाज शरीफ यांना पंतप्रधानपदी बसविले.

सत्तेवरून पायउतार होताच इम्रान यांनी लष्करावर आणि विरोधी पक्षांवर टीकास्त्र सोडून, घणाघाती भाषणांनी झंझावात निर्माण केला. महागाईने त्रस्त झालेल्या आणि जगणे मुश्कील झालेल्या बहुतेक पाकिस्तानींना इम्रान महानायक वाटू लागले. लोकप्रियतेच्या शिखरावर असलेले इम्रान लष्कराला ललकारू लागले, 'लष्करातील कोणावर टीका केली, तर लष्कराची बेइज्जती झाली असे कसे म्हणता येईल? लष्कर केवळ तुमचे नाही, ते आमचेही आहे. पाकिस्तान केवळ तुमचा नाही, तो आमचाही आहे.' एकूणच पाकिस्तानी लष्कराला ७५ वर्षांच्या इतिहासात प्रथमच इम्रान खान यांच्या रूपाने एक कडवे आव्हान मिळाले.

इम्रान यांची प्रखर टीका झोंबू लागल्याने त्यांचा कायमचा काटा काढण्यासाठी सरकारने त्यांना भ्रष्टाचाराच्या विविध प्रकरणांत गुंतविले. त्यातील एका प्रकरणी, अल कादिर ट्रस्ट प्रकरणी, त्यांना ९ मे २०२३ रोजी इस्लामाबाद उच्च न्यायालयात 'रेंजर' या निमलष्करी दलाने अटक केल्यानंतर संपूर्ण पाकिस्तानात आगडोंब उसळला. न्यायालयाने इम्रान यांची अटक बेकायदा ठरविल्यानंतर त्यांची मुक्तता केली गेली; परंतु लष्कर आणि इम्रान यांच्यातील संघर्ष विकोपाला गेला.

इम्रान यांनी लष्करी अधिकाऱ्यांतही आपले समर्थक निर्माण केले. इम्रान खान यांच्यावरून पाकिस्तानच्या लष्करात दोन गट असल्याचे चित्र 'जीना हाउस' प्रकरणानंतर तयार झाले होते. त्यातील लष्करप्रमुखांना पाठिंबा देणाऱ्या गटाने 'जीना हाउस'ची तोडफोड होऊ दिली; इम्रान यांना पाठिंबा देणाऱ्या गटाला कोंडीत पकडण्याची ही खेळी असल्याचे निरीक्षकांचे म्हणणे होते. या घटनेनंतर तीन दिवसांनी इम्रान यांना मदत केल्याच्या आरोपावरून लाहोरचे कोअर कमांडर लेफ्टनंट जनरल सलमान फय्याद गनी यांना पदावरून मुक्त

करून त्यांची चौकशी सुरू केली गेली.

९ मे रोजी हिंसाचार करणाऱ्या शंभराहून अधिक दंगलखोरांवर लष्करी न्यायालयांत खटले चालविले गेले. लेफ्टनंट जनरल हुद्द्याच्या एका अधिकाऱ्यासह तिघा लष्करी अधिकाऱ्यांना बडतर्फ केले गेले. आणि इम्रान खान यांच्या पक्षातील प्रमुख सहकाऱ्यांना त्यांच्यापासून दूर होण्यास भाग पाडले गेले. इम्रान खान एकाकी पडले. त्यांना ५ ऑगस्ट २०२३ रोजी न्यायालयाने दोषी ठरविले आणि तीन वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली. त्यावेळी मात्र ९ मेप्रमाणे हिंसक प्रतिक्रिया उमटल्या नाहीत.

इम्रान खान यांचे आव्हान लष्कराने परतवून लावले होते. पण, इम्रान परतणार होते; तुरुंगात राहूनही!

पाकिस्तानी लष्कराला अलीकडच्या काळात सर्वांत कडवे आव्हान देणारे इम्रान हे मूळचे क्रिकेटपटू. उत्कृष्ट जलदगती गोलंदाज अन् कल्पक कर्णधार ही त्यांची खरी ओळख. विश्वकरंडक क्रिकेटस्पर्धेत पाकिस्तानला विजय मिळवून देणारे नायक. क्रिकेटमधील कामगिरी आणि देखणे व्यक्तिमत्त्व, विविध प्रेमप्रकरणे, फॅशनच्या जगतातील सहज वावर यांमुळे ते सतत चर्चेत असत. क्रिकेटमध्ये शिखरावर असतानाच, त्यांनी त्यांच्या आईच्या नावाने लाहोर येथे रुग्णालयाची उभारणी केल्यामुळे सामाजिक क्षेत्रावरही त्यांनी ठसा उमटविला. क्रिकेटमधून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी राजकारणात भाग घेण्याचा निर्णय घेतला. मात्र, ते राजकारण गांभीर्याने करतील काय, असा प्रश्न उपस्थित केला गेला.

१९९६मध्ये त्यांनी 'पाकिस्तान तेहरीक ए इन्साफ' म्हणजेच 'पीटीआय' या आपल्या पक्षाची स्थापना केली. भारतातील संसदेप्रमाणे पाकिस्तानातील संसदेतही कनिष्ठ आणि वरिष्ठ सभागृहे आहेत. कनिष्ठ सभागृहाला 'नॅशनल असेंब्ली' म्हणतात, तर वरिष्ठ सभागृहाला 'सिनेट' म्हणतात. 'नॅशनल असेंब्ली'चे सदस्य थेट पद्धतीने निवडले जातात. १९९७मध्ये इम्रान खान यांनी 'नॅशनल असेंब्ली'च्या तब्बल नऊ जागांवरून निवडणूक लढविली; परंतु एकाही ठिकाणी ते जिंकू शकले नाहीत. १९९९मध्ये तत्कालीन लष्करप्रमुख परवेझ मुशर्रफ यांनी त्यावेळचे पंतप्रधान नवाझ शरीफ यांच्या विरोधात केलेल्या बंडाला इम्रान यांनी पाठिंबा दिला. शरीफ यांचे सरकार उलथवून मुशर्रफ देशाला भ्रष्टाचारमुक्त करतील, अशी भूमिका त्यांनी त्यावेळी घेतली होती. २००२च्या निवडणुकीत इम्रान यांनी चार जागांवरून निवडणूक लढविली आणि त्यांपैकी मियाँवाली मतदारसंघात ते विजयी झाले; परंतु त्यांच्या पक्षाला यश मिळाले नाही. लष्करशहा मुशर्रफ यांच्या सार्वमताला अन्य राजकीय

पक्षांनी विरोध केला असताना, इम्रान यांनी मात्र पाठिंबा दिला होता; परंतु पुढे २००७मध्ये मुशर्रफ जेव्हा अध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या रिंगणात उतरले, तेव्हा इम्रान यांनी अन्य पक्षांबरोबरच आपला विरोध दर्शविला. त्यावेळी इम्रान यांना अटकही झाली होती.

पाकिस्तानच्या राजकीय क्षितिजावर इम्रान खान नावाचा तारा मोठा झाला, तो ३० ऑक्टोबर २०११ रोजी; त्यावेळी लाहोर येथे त्यांनी सुमारे एक लाखांच्या गर्दीसमोर जोरदार भाषण केले. सर्व सत्ताधाऱ्यांच्या विरोधात आपली 'त्सुनामी' येत असल्याचे त्यांनी त्यावेळी जाहीर केले होते. पाकिस्तानी मतदारांनाही आता इम्रान आश्वासक वाटू लागले होते. त्यांच्या भाषणांना गर्दी होऊ लागली होती. इम्रान हे करिष्मा असलेले नेते होऊ शकतात, असे लष्कराला वाटले आणि पद्धतशीरपणे 'एक नेता' म्हणून त्यांना लोकांसमोर आणण्यात येऊ लागले. लष्कराच्या प्रसिद्धी विभागाने आणि खासगी वृत्तवाहिन्यांनी यात मोठी भूमिका बजावली. विविध वाहिन्यांवर इम्रान दिसू लागले. देशाशी संबंधित विविध प्रश्नांवर त्यांची भूमिका विचारली जाऊ लागली. त्यांची भाषणे प्रसारित केली जाऊ लागली. भुट्टो आणि शरीफ या पाकिस्तानी राजकारणातील दोन प्रमुख घराण्यांतील नेत्यांवर ते कडाडून प्रहार करू लागले. पाकिस्तानला 'रियासत ए मदिना' म्हणजे इस्लामी आदर्श देश बनविण्याची भाषा ते करू लागले. त्यांची भाषा आवडणारा वर्ग निर्माण होत गेला आणि एक नवीन शक्ती म्हणून इम्रान उदयाला आले.

लोकप्रियता वाढल्याने २०१३च्या निवडणुकीत आपल्याला मोठा विजय मिळेल, असा इम्रान यांचा अंदाज होता. मात्र, तो चुकीचा ठरला. इम्रान यांचा पक्ष तिसऱ्या क्रमांकावर राहिला. या निवडणुकीनंतर नवाज शरीफ यांची तिसरी कारकिर्द सुरू झाली. तिसऱ्यांदा सत्तेवर आल्याने लष्कराला आपल्या नियंत्रणाखाली आणू शकू, असा त्यांचा आविर्भाव होता. त्यामुळे लष्कराशी त्यांचे खटके उडू लागले. त्याचवेळी 'पनामा पेपर्स'चे प्रकरण बाहेर आले. परदेशातील काही कंपन्यांशी संधान साधून शरीफ यांनी एक कोटी डॉलरहून अधिक रकमेचा गैरव्यवहार केल्याचे आरोप त्यांच्यावर केले गेले. शरीफ डोईजड झाल्याने लष्कराने, 'पनामा पेपर्स' प्रकरणाची संधी साधून त्यांना सत्तेवरून खाली खेचले.

या काळात इम्रान खान हे शरीफ यांच्यावर रोज टीकास्त्र डागत होते. नवाज यांचा उल्लेख तर ते 'चोर' असाच करीत होते. एक भ्रष्टाचारमुक्त, आधुनिक आणि प्रगतिशील पाकिस्तानचे स्वप्न ते जनतेला दाखवित होते.

विकून भ्रष्टाचार केल्याच्या) प्रकरणी त्यांना न्यायालयाद्वारे ऑगस्ट २०२३मध्ये तुरुंगवासाची शिक्षा ठोठावण्यात आली आणि निवडणूक लढविण्यापासून पाच वर्षे बंदी घालण्यात आली. इम्रान यांना तुरुंगात डांबले गेले. 'कैदी नंबर ८०४' ही त्यांची ओळख बनली. (प्रस्तुत पुस्तक प्रसिद्धीला जात असताना, म्हणजे नोव्हेंबर २०२४मध्येही इम्रान यांची सुटका झालेली नव्हती.)

इम्रान पुन्हा परतणार नाहीत, २०२४च्या निवडणुकीत ते विजयी होऊ नयेत, यासाठी लष्कराकडून सर्व प्रकारे नेपथ्यरचना केली गेली. इम्रान यांच्या 'पीटीआय' पक्षातील सर्व प्रमुख नेत्यांना अटक केली गेली; कारावासाच्या भीतीने त्यांपैकी अनेकांनी इम्रान यांचा पक्ष सोडला. इतकेच नव्हे, तर काहींनी राजकारण-संन्यासही घेतला. इम्रान यांच्या पक्षाचे 'बॅट' हे निवडणूकचिन्हही काढून घेण्यात आले. 'पीटीआय'च्या उमेदवारांना एक समान चिन्ह मिळणार नाही हेही पाहिले गेले. तरीही इम्रान यांच्यामागे लोक उभे राहिले. २०२४मध्ये पाकिस्तानातील एकूण मतदारांत १८ ते २४ वर्षे या वयोगटांतील मतदारांचे प्रमाण ६० टक्के होते. या वर्गातील मतदारांवर इम्रान यांची मोहिनी वाढत गेली. परदेशांत स्थायिक असलेल्या पाकिस्तानींतही इम्रान लोकप्रिय होत गेले. हे दोन्ही वर्ग नवतंत्रज्ञान आणि समाजमाध्यमे हाताळू शकत असल्याने २०२४च्या निवडणुकीत नवनवीन मार्ग शोधण्यात आले. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्राने इम्रान यांच्या आवाजातील भाषणे समाजमाध्यमांवर प्रसारित करण्यात आली. तुरुंगात असूनही इम्रान यांची भाषणे देशभर पोहोचली. 'पीटीआय'च्या उमेदवारांना एक समान चिन्ह नसले, तरी प्रत्येक मतदारसंघात कोण उमेदवार आहे आणि त्याचे चिन्ह कोणते, हेही समाजमाध्यमांद्वारे पोहोचविण्यात आले. पाकिस्तानातील सत्ताधाऱ्यांनी आणि लष्कराने इम्रान यांची सर्व प्रकारे कोंडी केल्यानंतरही ते मतदारांपर्यंत पोहोचले आणि ८ फेब्रुवारी २०२४च्या निवडणुकीत त्याचे प्रतिबिंब दिसले.

इम्रान यांच्या 'पीटीआय'ला ९३ जागा मिळाल्या. नवाज शरीफ सत्तेवर यावेत यासाठी वातावरणनिर्मिती करूनही त्यांच्या 'पाकिस्तान मुस्लीम लीग' (पीएमएल-एन)ला बहुमतापर्यंत जाता आले नाही. अंतिम निकालात या पक्षाला १२३ जागा मिळाल्या असल्या, तरी यांपैकी बहुतेक जागा इम्रान यांच्या पक्षाने जिंकल्याचा आरोप केला गेला. आपला पक्ष दोन-तृतीयांश जागांपर्यंत मजल मारत होता; परंतु आपल्या 'विजयी' उमेदवारांना 'पराभूत' दाखविले गेले, असा आरोप इम्रान यांनी केला. इम्रान यांना रोखण्यासाठी पाकिस्तानात 'पीएमएल-एन' आणि आसिफ अली झरदारी यांच्या 'पाकिस्तान पीपल्स पार्टी' (पीपीपी)

यांची आघाडी घडवून आणली असली, तरी इम्रान काय करतील याचा नेम नसल्याचे बोलले जाते.

इम्रान यांच्या 'नया पाकिस्तान'ने लष्कराच्या नियंत्रणाखालील 'पुराना पाकिस्तान'ला आव्हान दिले आहे. सत्तेवर असताना, नवा पाकिस्तान उभारण्याची संधी मिळूनही इम्रान यांनी ती साधली नाही; परंतु जुन्या पाकिस्तानवरील संकटांत त्यांच्या कार्यकाळात वाढच झाली. नवा आणि जुना अशा संघर्षात असलेला हा पाकिस्तान आपल्या अस्तित्वासाठी धडपडत आहे. द्वेषाच्या मुळावर पोसल्या गेलेल्या या देशात विद्वेष कमालीचा उफाळून आला आहे. धार्मिक उन्माद निर्माण करून, इस्लामला 'राष्ट्र' संबोधून निर्माण झालेल्या या देशाची गेल्या ७७ वर्षांची वाटचाल एका मोठ्या अपयशाच्या दिशेने होत आहे. याची सुरुवात झाली, ती 'पाकिस्तान' या संकल्पनेतून; 'पाकिस्तान का मतलब क्या' या प्रश्नातून.

□

## एक

# पाकिस्तान का मतलब क्या?



गोष्ट आहे, ३ जून १९४७ची. पुढे पाकिस्तानात लेखक म्हणून ख्यातनाम झालेले प्रशासकीय अधिकारी कुदरतुल्लाह साहब यांनी सांगितलेली. ज्यांच्या साम्राज्यावरून सूर्य कधी मावळत नाही, असे म्हटले जात होते, त्या ब्रिटिश साम्राज्याचा अस्त जवळ आला होता. या साम्राज्याचा मुकुटमणी असलेल्या भारतातून ब्रिटिश काढता पाय घेणार हे निश्चित झाले होते; परंतु जाताना ते देशाची फाळणी करून जाणार होते. या फाळणीसंबंधी एक बैठक या दिवशी होणार होती आणि तिचा तपशील रेडिओवरून जाहीर केला जाणार होता. त्यामुळे बहुसंख्य भारतीयांचे कान रेडिओला चिकटलेले होते.

कुदरतुल्लाह साहब त्यावेळी ओरिसात होते. फाळणीची योजना जाणून घेण्यासाठी कानात प्राण फुंकून रेडिओ ऐकत होते. त्यावेळी त्यांच्याबरोबर त्यांचा काश्मिरी स्वयंपाकी रमजान आणि बंगाली ड्रायव्हर रोझ महंमद हे दोघे होते. बैठकीतील भाषणे इंग्लिशमधून होती आणि ती तशीच प्रसारित केली जात होती. इंग्लिश फारसे कळत नसले, तरी रमजान आणि महंमद या दोघांचेही लक्ष रेडिओकडेच होते. बॅ. महंमद अली जीना यांचे भाषण सुरू होणार असल्याचे जाहीर झाले तेव्हा, रमजानने रेडिओवर अत्यंत प्रेमाने हात फिरविला.

जीनांचे भाषण संपले, तेव्हा रमजानने अल्लाहचे आभार मानले; मुस्लिमांसाठी पाकिस्तान निर्माण होणार म्हणून. त्याची फिरकी घेण्यासाठी कुदरतुल्लाह साहब यांनी विचारले, 'पाकिस्तान म्हणजे काय हे तरी तुला माहीत आहे काय?' त्यावर रमजान उत्तरला, 'होय साहेब. मला माहिती आहे. पाकिस्तान म्हणजे *ला इलाह इल्लल्लाह.*' (देव म्हणजे फक्त अल्लाह; बाकी कोणी नाही, असा याचा अर्थ.) रमजानची आणखी फिरकी घेत त्यांनी




पाकिस्तान अस्तित्वात येऊन ७६ वर्षे झाल्यानंतर आजही तिथे
'पाकिस्तान का मतलब क्या?' हा प्रश्न विचारला जातो; अगदी तिथल्या भिंतींवरही.

विचारले, 'पण, पाकिस्तान कसं निर्माण होणार, हे तर माहीत आहे काय?' त्यावर रमजानचे उत्तर होते, 'होय साहेब. *ला इलाह इल्लल्लाह. ला इलाह इल्लल्लाह.'*

ज्या पाकिस्तानसाठी प्रामुख्याने १९४०पासून अवघ्या भारतात हिंदू-मुस्लीम धार्मिक विद्वेष निर्माण केला गेला, या दोन्ही धर्मांना 'राष्ट्र' संबोधत द्विराष्ट्र सिद्धांत मांडला गेला, या सिद्धांताला अनुकूल अशा मांडणीसाठी जीना यांच्यासह मुस्लीम लीगच्या नेत्यांनी इतिहासाची मोडतोड केली, वेगळ्या देशाची आपली मागणी मान्य व्हावी म्हणून मुस्लिमांना रस्त्यावर येऊन थेट कृती करण्याचे म्हणजेच हिंसाचाराचे आवाहन केले गेले, त्यातून देशभर दंगली उसळल्या आणि या रक्तरंजित घडामोडींनंतर मागणी स्वीकारली गेली, त्या पाकिस्तानच्या चळवळीबद्दल रमजानसारख्या सामान्य मुस्लिमाच्या लक्षात काय राहिले? तर *'ला इलाह इल्लल्लाह'*! देव म्हणजे फक्त अल्लाह!

आणि ही गोष्ट अगदी अलीकडची. २०२२मधील. पंतप्रधानपदावरून इम्रान खान यांची गच्छंती झाल्यानंतर त्यांनी पाकिस्तानच्या वेगवेगळ्या शहरांत सभा घेतल्या. राजकीय प्रतिस्पर्ध्यांवर हल्ला करतानाच ते प्रत्येक सभांत

## चार

# लष्कर : शक्तिशाली पालक

'पाकिस्तानी लष्कराच्या प्रमुखाने जर राजकीय सत्ता ताब्यात घेण्याचा निश्चय केला, की फक्त अल्लाहच त्याला त्यापासून रोखू शकतो. बाकी कोणाला ते शक्य नाही.' हे विधान आहे, पाकिस्तानचे पहिले लष्करशहा अयुब खान यांचे. आपले चिरंजीव गोहर अयुब यांच्याशी बोलताना त्यांनी केलेले हे विधान पाकिस्तानमधील लष्कराची मानसिकता अधोरेखित करणारे म्हणावे लागेल.

पाकिस्तानच्या सर्व अपयशांचे खापर राजकीय नेत्यांवर फोडून आणि राजकीय नेत्यांना अविश्वासार्ह ठरवून, आपली प्रतिमा उजळविणारे लष्कर ही तिथे कार्यरत असलेली सर्वांत ताकदवान संस्था. या ताकदीमुळेच लष्कराचे वर्णन करताना 'एस्टॅब्लिशमेंट' किंवा 'इन्स्टिट्यूट' अशा संज्ञा वापरतात. एका स्वतंत्र राष्ट्रातील दुसरे स्वतंत्र राष्ट्र 'डीप स्टेट' असेही तिथे लष्कराला म्हटले जाते. प्रत्येक देशाला संरक्षणासाठी स्वतःचे लष्कर असते; परंतु पाकिस्तानात लष्करासाठी एक संपूर्ण देश आहे, असे म्हटले जाते ते यामुळेच.

पाकिस्तानचे अभ्यासक स्टीफन कोहेन यांनी तेथील लष्कराचे नेमके वर्णन केले आहे. ते म्हणतात, 'बहुतेक देशांत आपल्या सीमांच्या रक्षणासाठी लष्कर असते. काही देशांत लष्कर समाजाचे रक्षण करीत असते आणि मुख्य म्हणजे स्वतःच्या स्थानाचेही रक्षण करते. क्वचितच लष्कर आपल्या देशाच्या संकल्पनेचे, अस्मितेचेही रक्षण करीत असते. पाकिस्तानचे लष्कर मात्र या तिन्ही गोष्टी करते.' यामुळेच पाकिस्तानात लष्कराचे स्थान अनन्यसाधारण आहे. 'हिंदू भारता'च्या विरोधात 'मुस्लीम पाकिस्तान'चे रक्षण करण्यासाठी आपल्याशिवाय पर्याय नाही, हे लष्कराने तेथील जनमानसात भिनवले आहे. म्हणूनच 'लष्कर नसेल, तर पाकिस्तानचे अस्तित्व नसेल,' (नो आर्मी, नो

## पाच

# जिहादचे कारखाने

मुस्लिमांसाठी पाकिस्तान हा देश निर्माण होईल, अशी भविष्यवाणी खुद्द कुराणमध्ये करण्यात आल्याचा दावा तेथील काही धर्ममार्तंड करतात. 'हिंदू भारताच्या विरोधात जिहाद करून पाकिस्तान मिळवला गेला,' असे ते सांगतात. पेशावर येथील इस्लामचा अभ्यासक मुफ्ती गुलाम फरीद हक्कानी याने 'पाकिस्तान और अफविज ए पाकिस्तान का तज़किरा कुरान और हदीस में' (कुराण आणि हदीस या धर्मग्रंथांत पाकिस्तानचा आणि पाकिस्तानी लष्कराचा उल्लेख) अशी पुस्तिका लिहिली आहे. हिंदूंच्या विरोधात कायमस्वरूपी लढण्यासाठी पाकिस्तानी लष्कराचा उल्लेख हदीसमध्ये असल्याचा दावा त्याने या पुस्तकात केला आहे.

अत्यंत प्रक्षोभक भाषेत धार्मिक राष्ट्रवाद व्यक्त करणारी आणखी एक व्यक्ती म्हणजे सईद झैद हमीद. पाकिस्तानातील अनेक दूरचित्रवाणी वाहिन्यांवर इस्लाम आणि सुरक्षा यांच्या अनुषंगाने बोलताना तो भारताच्या विरोधात गरळ ओकत असतो. 'पाकिस्तानला अल्लाहने का बनविले होते?' असा सवाल विचारून तो सांगतो, 'या पाकिस्तानला अल्लाहने फक्त एवढ्यासाठीच बनविले, की 'गजवा ए हिंद' लढायचे आहे. हिंदुस्थानवर पुन्हा एकदा कब्जा मिळवायचा आहे.' 'गजवा ए हिंद' म्हणजे हिंदुस्थानच्या विरोधातील युद्ध. त्याचा उल्लेख 'हदीस'मध्ये असल्याचा दावा केला जातो. अफगाणिस्तानातील सोव्हिएत फौजांच्या विरोधात अफगाण मुजाहिदीनच्या बरोबरीने लढल्याचे हमीद सांगतो. 'आयएसआय' या पाकिस्तानी लष्कराच्या गुप्तचर संघटनेशी त्याचे संबंध असल्याचे बोलले जाते. अणुबॉम्ब विकसित करणे ही पाकिस्तानची आतापर्यंतची सर्वांत मोठी कामगिरी असल्याचे तो नमूद करतो. या अणुबॉम्बच्या भीतीमुळेच भारत पाकिस्तानवर हल्ला करणार नाही, असे सांगताना तो म्हणतो, 'पाकिस्तान एक

# उपसंहार

‘आम्हाला इथं काही भवितव्य दिसत नाही. त्यामुळं बाहेर जाण्याशिवाय पर्याय नाही...’

‘खरंतर इतका सुंदर देश सोडून जाण्याची इच्छा नाही; परंतु परिस्थिती अशी आहे की नशीब काढण्यासाठी दुसरीकडं कुठंतरी जावंच लागेल...’

‘तब्बल वीस लाख रुपये खर्चून मला आई-वडलांनी शिकवलं. मला इथं केवळ तीस हजार रुपयांची नोकरी मिळालीय. इथं राहिलो तर अशाच तुटपुंज्या उत्पन्नात राहावं लागेल. त्यामुळे देश सोडून जाण्याच्या संधी शोधतोय...’

‘इथं आता काहीच राहिलं नाही. माझ्याकडं गुणवत्ता आहे. कष्ट करण्याची तयारी आहे. त्यामुळं इतरत्र जाईन...’

या आहेत, पाकिस्तानातील तरुणाईच्या प्रातिनिधिक प्रतिक्रिया. २०२३मध्ये पाकिस्तान जेव्हा आर्थिक दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर होता, तेव्हा एका स्थानिक वृत्तवाहिनीने तेथील विविध शहरांतील तरुण-तरुणींच्या मुलाखती घेतल्या. देशातील स्थितीबद्दल बहुतांश तरुण नाराज होते; आपल्याला भवितव्य नसल्याचे आणि परदेशातील संधी शोधत असल्याचे ते सांगत होते. देश सोडून जाण्यासाठी कोणत्याही प्रकारची जोखीम पत्करण्याची तयारी घेण्यास तयार असल्याचेही ते सांगत होते.

अशीच जोखीम घेऊन, युरोपीय देशांत बेकायदा स्थलांतर करणारे शेकडो पाकिस्तानी १४ जून २०२३ रोजी एका दुर्घटनेत मृत्युमुखी पडले. लीबियाहून निघालेल्या एका बोटीत ते बसले होते. भूमध्य सागरातून प्रवास करीत ही बोट ग्रीसच्या दक्षिणेला आल्यानंतर उलटली. त्यात सुमारे ४०० जण होते; त्यांपैकी ३५० पाकिस्तानी होते. पाकिस्तानातून दुबई, इजिप्त मार्गे ते लीबियात पोहोचले होते. तेथून ते नशीब कमावण्यासाठी युरोपला चालले होते. यांपैकी बहुतेकांकडे तेथील कोणत्याही देशाचा व्हिसा नव्हता. मानवी तस्करी करणाऱ्यांनी त्यांच्याकडून प्रत्येकी आठ हजार डॉलर घेऊन युरोपात नेण्याची आशा दाखवली होती; आणि त्यावर विश्वास ठेवून ते निघाले होते. दुर्दैवाने बोट बुडाली. त्यात मोजकेच वाचले. २८ वर्षांचा नदीम हक त्यांपैकी एक. संयुक्त राष्ट्रांच्या मदतीने तो मायदेशी परतला. माध्यमांशी बोलताना तो सांगत होता, ‘देशातील परिस्थिती खूपच बिघडली आहे. या

महागाईच्या दिवसांत माझी कमाई अपुरी पडतेय. अशा वेळी बाहेर जाऊन अधिक पैसे कमावण्याचा विचार होता.' या दुर्घटनेची पाकिस्तानच्या संसदेतही चर्चा झाली. मानवी तस्करी करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा तत्कालीन गृहमंत्री राणा सलाउल्लाह खान यांनी दिला. मात्र, ज्या कारणांमुळे लोक या तस्करांकडे जातात, त्या कारणांवर उपाय शोधण्याबद्दल त्यांनी भाष्य केले नाही.

अशा दुर्घटनांची जोखीम पत्करूनही कायदेशीर किंवा बेकायदा स्थलांतर करणाऱ्यांची संख्या पाकिस्तानात वाढत आहे. २०२३च्या मध्यावर पाकिस्तान सरकारच्या सांख्यिकी विभागाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, त्या वर्षातील पहिल्या सहा महिन्यांत तब्बल आठ लाख पाकिस्तानी रोजगारासाठी स्थलांतरित झाले होते. त्यांमध्ये डॉक्टर, इंजिनीअर, व्यवस्थापनतज्ज्ञ, वकील आदी उच्चशिक्षितांचा भरणा होताच; परंतु त्याचबरोबर कुशल आणि अकुशल कामगारही मोठ्या संख्येने होते. परदेशी जाणाऱ्यांत पाकिस्तानातील सर्वांत सशक्त आणि सधन असलेल्या पंजाबमधील लोकांची संख्या सर्वाधिक म्हणजे चार लाखांहून अधिक होती. २०२३च्या पहिल्या सहा महिन्यांतील ही संख्या २०२१मधील संख्येपेक्षा तब्बल चौपट होती. २०२१मध्ये सव्वा दोन लाख पाकिस्तानींनी परदेशी जाण्याचा रस्ता धरला होता. २०२०मध्ये ही संख्या त्याहून किंचित अधिक म्हणजे २.८० लाख होती. या दोन्ही वर्षांत कोव्हिड साथरोग होता आणि अवघ्या जगात टाळेबंदी होती. प्रवासावर निर्बंध होते. तरीही पाकिस्तानातून स्थलांतर होत होते. हे स्थलांतर रोजगारासाठी असले, तरी त्यांपैकी बहुतेक जण मायदेशी परत येत नाहीत, याकडे तेथील अभ्यासक लक्ष वेधतात.

कोव्हिडची साथ सौम्य झाल्यानंतर २०२२मध्ये ६.७५ लाख पाकिस्तानींनी स्थलांतर केले होते. त्याच्यानंतरच्या वर्षी म्हणजे २०२३मध्ये याहून अधिक लोकांनी पहिल्या सहा महिन्यांतच स्थलांतर केले. त्या वर्षात पाकिस्तानातून गूगलवर सर्वाधिक शोधला गेलेला शब्द 'व्हिसा' होता. अन्य देशांचा व्हिसा मिळविण्यासाठी तेथील जनतेची धडपड यातून दिसते. परदेशी जाणे ही काही सोपी गोष्ट नाही. त्यासाठी पैसा लागतो. त्यामुळे साहजिकच ऐपत असणारेच स्थलांतर करीत होते. 'ज्यांच्याकडे पैसे आहेत, ते देश सोडून चालले आहेत; आम्ही पडलो गरीब. आम्ही कुठं जाणार?' अशा शब्दांत काही तरुण त्या वृत्तवाहिनीच्या मुलाखतीत आपले नैराश्य व्यक्त करीत होते.

पाकिस्तानात आपल्याला भवितव्य नसल्याचे तेथील लोक अलीकडे